महाडमध्ये चवदार तळे सत्याग्रह दिन; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५५ कोटींच्या विकासकामांचा प्रारंभ >> पान 2

उत्पन्नाच्या तुलनेत 'एसटी'ला दररोज २ कोटींचा तोटा >> पान 3

गॅस तुटवड्याने नागरिक हैराण; महिला आघाडीचा सरकारला इशारा >> पान 4

**सुविचार**

निसर्गातील प्रत्येक वस्तूमध्ये काहीतरी आश्चर्यकारक आहे. - ॲरिस्टॉटल


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 221 ■ शनिवार, दि. 21 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





कार्तिक आर्यनचा नागझिलामधील फर्स्ट लूक आला समोर

आतील पान

## संक्षिप्त...

### दहशतवादाचा नकाशा बदलला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जागतिक दहशतवादाच्या चित्रात मोठा बदल होत असून पाकिस्तान आता जगातील सर्वाधिक दहशतवादग्रस्त देश ठरला आहे. इन्स्टिट्यूड फॉर इकोनॉमिक्स अँड पीस च्या ग्लोबल टेररिझम इंडेक्स २०२६ अहवालानुसार, यापूर्वी अव्वल असलेला पश्रि्चम आफ्रिकेतील बुर्किना फासो हा देश दुसऱ्या क्रमांकावर घसरला असून नायजर तिसऱ्या स्थानावर आहे. अहवालानुसार, २०२५ मध्ये पाकिस्तानमध्ये तब्बल १,०४५ दहशतवादी घटना घडल्या. या हल्ल्यांमध्ये १,१३९ जणांचा मृत्यू झाला, तर १,५९५ जण जखमी झाले. हा गेल्या दशकातील सर्वात गंभीर आकडा मानला जातो.

### कंत्राटदाराची मनधरणी ?

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईतील २६ जुलैच्या महा-पुराला कारणीभूत ठरलेल्या मिठी नदीतील गाळाची सफाई करण्यासाठी आता कंपन्याच पुढे येत नसल्यामुळे यातील गाळाची सफाई करायची असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, सर्व प्रकारची अटी शिथिल करूनही याबाबतच्या निविदेला कंत्राटदारांचा प्रतिसाद न लाभल्याने कमी अवधीमध्ये नवीन कंत्राटदारांची निवड करून काम करणे अशक्य ठरणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाला आता मिठी नदीच्या सफाईसाठी यापूर्वी निवड केलेल्या कंत्राटदारांच्या पाया पडण्याची वेळ येणार असल्याचे दिसून येत आहे.

### अशोक खरातची मालमत्ता समोर

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमध्ये बलात्कार प्रकरणात अटकेत असलेल्या अशोक खरात उर्फ 'कॅप्टन' याच्या संपत्तीची चौकशी सुरू असून, तपासात त्याच्याकडे कोट्यवधींची मालमत्ता असल्याचे उघड झाले आहे. घर व फार्महाऊस झडतीत पिस्तूल, काडतुसे आणि रोकड सापडली. नाशिक, सिन्नर व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमिनी, फार्महाऊस व मालमत्ता आढळली. अंकशास्त्राच्या माध्यमातून प्रभाव निर्माण करत सुमारे २०० कोटींची संपत्ती जमवल्याचा अंदाज आहे. एसआयटी तपास सुरू आहे.

### मामा भाच्यांचा अपघाती मृत्यू

**ढाकना/वृत्तसंस्था :** उज्जैनहून नागपूरकडे परतणाऱ्या भाविकांच्या कारचा मध्यप्रदेशातील ढाकना गावाजवळ भीषण अपघात होऊन कामठीतील शुभम जयस्वाल (२८) याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचे मामा पारस कनोजिया (३५) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अमन जयस्वाल व जतिन कनोजिया गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. चालकाला झोप लागल्याने अपघात झाल्याची शक्यता असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### भारतीय कॅप्टनचा मृत्यू

**नालंदा/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील तणावाचा मानवी परिणाम समोर आला असून होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकलेल्या 'अवाना' जहाजाचे कॅप्टन राकेश रंजन सिंह यांचे निधन झाले आहे. २८ फेब्रुवारीपासून जहाज समुद्रात अडकले होते आणि तब्बल १८ दिवस तेथेच थांबावे लागले.मूळचे बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील रहिवासी असलेले सिंह यांचे कुटुंब सध्या रांची येथे राहते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. दि. १८ मार्च रोजी त्यांची प्रकृती अचानक बिघडली. जहाजावरील अधिकाऱ्यांनी दुबई एटीसीकडे एअर ॲम्ब्युलन्सची मागणी केली, मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे परवानगी मिळू शकली नाही. त्यानंतर बोटीने किनाऱ्यावर आणण्याचा प्रयत्न झाला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. अखेरीस हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.




# भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या तळाशी जाणार, कुणालाही सोडणार नाही- गृहराज्यमंत्री पंकज भोयर

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणमध्ये नवनवीन माहिती पुढं येत आहे. त्या अनुषंगानं कारवाई करण्यात येत असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे. मंत्री पंकज भोयर शुक्रवारी नागपूर इथं माध्यमांशी बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी प्रतिक्रिया दिली.

राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनामाची मागणी जोर धरत आहे. त्यावर बोलताना ते म्हणाले की ''रुपाली चाकणकर यांच्या राजीनामाची मागणी हा राजकीय विषय ठरतो. मात्र, या प्रकरणात जे कुणी ही गुंतलेलं आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. सध्या चौकशीला सुरुवात झाली आहे. आता जी काही माहिती मिळेल, त्याचं अनुषंगानं पुढील कारवाई होईल,'' अशी माहिती पंकज भोयर यांनी दिलीय.

अनेकांचं नावं तपासात पुढं येणार : ''याप्रकरणात अनेक मंडळी असल्याचं सांगण्यात येत आहे. जोपर्यंत सखोल चौकशी होत नाही, पूर्ण घटनाक्रम पुढं येणार नाही. त्यामुळंच सखोल चौकशी झाल्यानंतर अंतिम सत्य पुढं येईल. उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री असताना भोंदूबाबा अशोक खरातच्या हिताचा निर्णय घेतल्याचा आरोप होत आहे. याबाबत आमच्यापर्यंत माहिती आलेली नाही. मात्र, अशा बाबी घडल्या असतील तर त्याची चौकशी केली जाईल. तसंच संबंधित दोषींवर कारवाई केली जाईल,'' असं गृहराज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले.

कारवाई तर होणारच : ''अनेक लोक आपलं भविष्य बघण्यासाठी भोंदूबाबा अशोक खरातकडं जात होते. त्यांच्याशी निगडित काही आक्षेपार्ह गोष्टीसुद्धा सामोर आल्या आहेत. त्यांची चौकशी सुरू झाली आहे. ती चौकशी अंतिम टप्प्यात आल्यावर किंवा पूर्ण झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल. सरकारी कर्मचारी, अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी असो त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई होणार आहे,'' असं मंत्री भोयर म्हणाले.

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या निमंत्रणावरून गृह विभागाचा कार्यक्रम घेण्यात आला. पोलीस ताफ्यात नवीन वाहन दाखल झाली आहेत. त्या वाहनांच्या लोकार्पण कार्यक्रमासाठी सिंधुदुर्गला गेलो होतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शक्तिपीठ महामार्गाचं काम वर्ध्यातून सुरू होणार आहे. त्यामुळं वर्धा ते सिंधुदुर्ग अशी कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. त्यामुळं विदर्भातील टायगर आणि सिंधुदुर्गातील मरीन टुरिझम याला चालना मिळणार आहे,'' अशी माहिती मंत्री भोयर यांनी दिली.



ते नेहमी संधी शोधत असतात : ''काँग्रेस विरोधी पक्षात असल्यानं ते संधी शोधत असतात. कुठल्या तरी कारणासाठी मोर्चा काढून लोकांना भ्रमित करण्याचं काम करत आहेत. मात्र आज देशात पंतप्रधान मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य प्रगती करत आहे,'' असं मंत्री भोयर म्हणाले.

तपास वेगानं सुरू : भोंदूबाबा अशोक खरात खरातचं बिंग फोडणाऱ्या नीरज जाधवला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. नीरज जाधवनंच खरातच्या केबिनमधील सीसीटीव्ही फुटेज बाहेर आणल्याचा संशय व्यक्त केला जातोय. पीडित मुलीला तिचे मॉर्फ केलेल्या व्हिडिओचे स्क्रीनशॉट्स पाठवल्या प्रकरणी नीरज जाधव विरोधात शिर्डी पोलिसात गुन्हा दाखल आहे. जाधवकडं खरातचे महिलांवरील अत्याचाराचे १०० हून अधिक व्हिडिओ असल्याची माहिती समोर येत आहे. नीरज जाधवनं हे व्हिडिओ काढल्याचा पोलिसांनी संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी एसआयटीकडून तपास सुरू आहे.

# पश्चिम आशियात तणाव वाढला; पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी केली आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा

## ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ल्यांचा भारताकडून तीव्र निषेध

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कतार, फ्रान्स, जॉर्डन, ओमान आणि मलेशिया या देशांच्या नेत्यांशी महत्त्वपूर्ण चर्चा करत परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली.

या संवादांदरम्यान मोदी यांनी ऊर्जा पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा तीव्र निषेध नोंदवला आणि तणाव कमी करण्यासाठी संवाद व राजनैतिक मार्गाचाच अवलंब करण्यावर भर दिला. तसेच, होर्मुझ सामुद्रधुनीत सुरक्षित आणि मुक्त जलवाहतुकीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कतारचे अमीर, जॉर्डनचे राजा आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष यांच्याशी बोलताना मोदी यांनी शांतता आणि स्थैर्य पुनर्स्थापित करण्यासाठी सहकार्याची गरज व्यक्त केली.

ओमानचे सुलतान आणि मलेशियाचे पंतप्रधान यांच्याशीही त्यांनी संवाद साधत तणाव कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.

या चर्चांमधून भारताने पुन्हा एकदा शांतता, सुरक्षितता आणि जागतिक स्थैर्यासाठी आपली ठाम भूमिका स्पष्ट केली आहे.

# केंद्र सरकारचा 'डिजिटल स्ट्राईक'; ३०० हून अधिक बेकायदेशीर जुगार आणि बेटिंग ॲप्सवर मोठी कारवाई

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील वाढत्या बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि सट्टेबाजीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने एका मोठ्या कारवाईत ३०० हून अधिक बेकायदेशीर बेटिंग वेबसाइट्स आणि मोबाइल ॲप्सवर बंदी घातली आहे. केंद्र सरकारच्या या धडक कारवाईमुळे ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या जाळ्यांचे कंबरडे मोडले असून, डिजिटल माध्यमांतून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला लगाम बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारकडून बेकायदेशीर सट्टेबाजींविरोधातील मोहीम गेल्या काही काळापासून सातत्याने राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत एकूण सुमारे ८,४०० वेबसाइट्सवर कारवाई करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने लागू केलेल्या नवीन 'ऑनलाइन गेमिंग' नियमानंतर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. या नव्या कायद्याचा आधार घेत प्रशासनाने तब्बल ४,९०० वेबसाइट्स आणि ॲप्स पूर्णपणे ब्लॉक केली आहेत. यामध्ये अनेक परदेशी ॲप्सचाही समावेश असून, जे भारतीय चलनामध्ये सट्टा लावण्यासाठी प्रवृत्त करत होते.

सरकारने केलेल्या या कारवाईची व्याप्ती मोठी आहे. यामध्ये प्रामुख्याने




ऑनलाइन स्पोर्ट्स बेटिंग प्लॅटफॉर्म्सचा समावेश आहे, जे क्रिकेट, फुटबॉल आणि इतर मोठ्या क्रीडा स्पर्धांवर सट्टा लावण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत होते. यासोबतच ऑनलाइन कॅसिनो, स्लॉट्स, रूलेट आणि लाईव्ह डीलर गेम्स चालवणाऱ्या वेबसाइट्सवरही बंदी घालण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, पी-२-पी बेटिंग मार्केटप्लेस म्हणजेच 'बेटिंग एक्स्चेंजेस' आणि पारंपरिक सट्टा किंवा मटका चालवणारी डिजिटल नेटवर्क्स केंद्र सरकारच्या रडारवर आली आहेत. रिअल-मनी कार्ड गेम्स आणि अनधिकृत कॅसिनो गेम ॲप्सचाही यामध्ये समावेश आहे.

ऑनलाइन जुगाराच्या व्यसनामुळे अनेकांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी सरकारकडे प्राप्त होत होत्या. या पार्श्र्वभूमीवर, केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, आगामी काळात बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि बेटिंगविरोधातील ही मोहीम अधिक तीव्र केली जाईल.

# सातारा जिल्हा परिषदेवर पहिल्यांदाच भाजपचा झेंडा

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी :** राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच सातारा जिल्हा परिषदेत भारतीय जनता पक्षाने सत्ता स्थापनेत यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, राज्यभरात दिसून आलेला भाजपचा करिश्मा आता सातारा जिल्ह्यातही स्पष्टपणे पाहायला मिळाला आहे. या निवडणुकीत भाजपचे संख्याबळ केवळ २८ सदस्यांपर्यंत मर्यादित असताना, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे यांच्या नेतृत्नात स्थानिक भाजपने केलेल्या प्रयत्नांना उल्लेखनीय यश मिळाले आणि भाजपच्या पाठिंब्यात वाढ



झाली. जिल्हा परिषदेत ३३ सदस्यांचा पाठिंबा मिळवत भाजपने सत्ता मिळवली. विरोधकांना ३० मते मिळाली.

निर्णायक बहुमताच्या जोरावर भाजपच्या प्रिया शिंदे यांची सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी राजू भोसले यांना संधी मिळाली आहे. या विजयामुळे केवळ सत्ता परिवर्तन झाले नाही, तर साताऱ्यासारख्या पारंपरिक राजकीय बालेकिल्ल्यात भाजपाने आपली मजबूत पकड निर्माण केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कॅबिनेट मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली घडलेली ही राजकीय खेळी सातारा जिल्ह्यासह राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण ठरली आहे. स्थानिक पातळीवरील सूक्ष्म नियोजन, प्रभावी संवाद आणि संघटन कौशल्य यामुळे भाजपला हा ऐतिहासिक विजय मिळवता आला. सातारा जिल्हा परिषदेत पहिल्यांदाच भाजपचा झेंडा फडकला असून, यामुळे आगामी काळात जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच, या निकालामुळे राज्यातील राजकीय समीकरणांवरही दूरगामी परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# संताप, राग अन् खरात! राजीनामा दिल्यानंतर रुपाली चाकणकर यांची पहिली प्रतिक्रिया, सगळे पाहतच राहिले

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बलात्कार प्रकरणी अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणामुळे वादात सापडलेल्या रुपाली चाकणकर यांनी अखेरीस आमच्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. पदाचा राजीनामा दिल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी संपूर्ण प्रकरणावर संताप व्यक्त केला आहे. तसंच, आपल्याविरोधात खोट्या बातम्या पसरवल्या गेल्या, खोटी माहिती दिली गेली आहे, त्यांच्यावर कायदेशीर नोटीसा पाठवल्या जातील, अशी भूमिका चाकणकर यांनी मांडली.

अशोक खरात प्रकरणी मुंबईत



घडामोडींना वेग आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर देवगिरी बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा सुपूर्द केला. देवगिरी बंगल्यावरून बाहेर आल्यानंतर चाकणकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

> **या देवस्थानशी माझ्या कुटुंबीयाचा संबंध होता, पण खरात आणि त्याच्या व्यक्तीगत आयुष्याबद्दल काही माहिती नव्हतं पोलिसांनी या प्रकरणी खोलवर तपास करावा, याची मागणी मी पोलिसांकडे केली होती.**

''शिवलिका संस्थानमध्ये मी जेव्हा प्रदेशाध्यक्ष होते, तेव्हापासून तिथे काम केलं. समाजातील अनेक प्रतिष्ठीत व्यक्ती आणि अनेक मान्यवर व्यक्ती त्या ट्रस्टवर होते. या ट्रस्टवर होते त्यानंतर आयोगाची अध्यक्ष झाले.

८ ऑगस्ट २०२५ रोजी या ट्रस्टचा कार्यकाळ संपला होता. सामाजिक आयुष्य जगत असताना कुणाला कुणाला तरी गुरू मानत असतो. खरात यांना आम्ही गुरू माणलं, त्या ठिकाणी शैक्षणिक कार्यक्रम असेल, महाशिवारात्रीचा कार्यक्रम असेल, त्यावेळी आम्ही उपस्थितीत राहत होतो. गुरुपौर्णिमाच्या निमित्ताने ती पाद्यपुजा केली होती. ५ ते ६ वर्ष संपर्कात होतो, एखाद्याचं कृत्य काय, ते कसे वागतात याची सुतराम कल्पना नव्हता. मला ही घटना समजली तेव्हा मला धक्का बसला अशी प्रतिक्रिया चाकणकरांनी दिली.

## ट्रान्सजेंडर व्यक्ती सुधारणा विधेयकाला विरोध...

केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री वीरेंद्रकुमार यांनी लोकसभेत ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्क संरक्षण) सुधारणा विधेयक २०२६ सादर केले. या प्रस्तावित विधेयकात ट्रान्सजेंडर व्यक्तीची व्याख्या अधिक मर्यादित करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, कायदेशीर लिंग ओळख मिळवण्यासाठी वैद्यकीय पुरावा आवश्यक करण्याची तरतूद आहे. या बदलांमुळे स्वतःची लिंग ओळख मान्य करण्याऐवजी अधिक कडक अटी लागू केल्या जाणार आहेत. त्यामुळे मागील काही वर्षांत आंदोलन, न्यायालयीन निर्णय आणि कायद्यांमुळे मिळालेले हक्क धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यासाठी या विधेयकाला देशभरातील ट्रान्सजेंडर समुदायाकडून विरोध केला जात आहे. मुंबईतही यासंदर्भात ट्रान्स समुदायाकडून मोर्चाचं आयोजन करण्यात येणार आहे. या आंदोलनात फक्त ट्रान्स समुदायातील लोक सहभागी नसून तर डॉक्टरर्स, वकील, मानसोपचारतज्ज्ञ, सामाजिक संस्था असे इतर असंख्य लोक सहभागी होणार आहेत. ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्क संरक्षण) सुधारणा विधेयक, २०२६ हे विधेयक २०१९ च्या कायद्यात बदल करण्यासाठी आहे, ज्यामध्ये ट्रान्सजेंडर व्यक्तींचे हक्क आणि कल्याण याबद्दल तरतुदी आहेत. या नवीन विधेयकात ट्रान्सजेंडर व्यक्तीची आधीची व्याख्या काढून टाकण्यात आली आहे. आधी, जन्मावेळी दिलेल्या लिंगाशी न जुळणारी व्यक्ती ट्रान्सजेंडर मानली जात होती. आता त्याऐवजी काही ठराविक गटांची यादी दिली आहे. तसेच, वेगवेगळ्या लैंगिक ओळखी किंवा स्वतःची ओळख असलेल्या व्यक्तींना या व्याख्येत समाविष्ट केले जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.मात्र, काही गट कायम ठेवले आहेत जसे की किन्नर, हिजडा, अरवाणी, जोगता यांसारखी सामाजिक-सांस्कृतिक ओळख असलेले लोक, तसेच जन्मतः शरीरातील वैशिष्ट्यांमध्ये (जसे जननेंद्रिये, क्रोमोसोम्स किंवा हार्मोन्स) वेगळेपणा असलेले लोक. या विधेयकात काही मोठे बदल सुचवण्यात आले आहेत. आधीच्या कायद्यात असलेले ट्रान्स-मॅन, ट्रान्स-वुमन (शस्त्रक्रिया झाली किंवा नाही तरी) आणि 'जेंडरक्विअर' हे गट आता काढून टाकण्यात आले आहेत. त्याऐवजी युनुक (नपुंसक) आणि जबरदस्तीने शारीरिक बदल करून ट्रान्स ओळख दिलेल्या व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे. ओळखपत्रासाठी आता व्यक्तीला जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल, पण त्याआधी वैद्यकीय मंडळाच्या शिफारशीची गरज असेल. या प्रमाणपत्रावरून व्यक्तीला जन्म दाखला आणि इतर कागदपत्रांमध्ये नाव बदलता येईल. लिंग बदल केल्यास, नवीन प्रमाणपत्र घेणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, ज्या रुग्णालयात शस्त्रक्रिया झाली असेल, त्यांनी त्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देणे आवश्यक असेल. गुन्हे आणि शिक्षांबाबतही कडक तरतुदी करण्यात आल्या आहेत. कोणाला जबरदस्तीने ट्रान्स बनवणे, अपहरण करणे किंवा गंभीर दुखापत करणे यासाठी १० वर्षांपासून आजीवन कारावास आणि मोठा दंड ठोठावला जाऊ शकतो. तसेच, जबरदस्तीने भीक मागायला लावणे किंवा गुलामीसारखे काम करायला लावल्यास ५ ते १४ वर्षांपर्यंत शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे. २०१४ साली 'नालसा' विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देत प्रत्येक व्यक्तीला स्वतःची लिंग ओळख ठरवण्याचा अधिकार दिला होता. न्यायालयाने लिंग ओळख ही व्यक्तीची अंतर्गत भावना असून, ती जन्मतः दिलेल्या लिंगाशी जुळेलच असे नाही, असे स्पष्ट केले होते. मात्र, नव्या विधेयकामुळे या भूमिकेला धक्का बसू शकतो. तज्ज्ञांच्या मते, स्वतःची लिंग ओळख ही व्यक्तीच्या वागण्या-बोलण्यात, कपड्यांत आणि सामाजिक आयुष्यात दिसून येते. जन्मतः दिलेले लिंग आणि व्यक्तीची ओळख जुळत नसल्यास स्वतःची ओळख मान्य करून घेणे महत्त्वाचे ठरते. तज्ज्ञांच्या मते, हे विधेयक ट्रान्सजेंडर, इंटरसेक्स आणि वेगळी लिंग ओळख असलेल्या मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांच्यावरचा भेदभाव वाढवू शकते. मुंबईत राहणारे मृदूल (ट्रान्स मॅन) सांगतात, ''हे विधेयक आमच्या स्वतःची ओळख ठरवण्याच्या अधिकारावर थेट आघात करतं. 'ट्रान्स' असणं हे केवळ सामाजिक-सांस्कृतिक गटात बसण्यावर किंवा 'जबरदस्तीने' झालेल्या ओळखीवर ठरत नाही, ते व्यक्तीच्या लिंग ओळखीवर वर ठरतं. पण या विधेयकात त्यालाच नाकारलं जात आहे. या विधेयकात कलम १८ मध्ये कडक तरतूद आहे. ती म्हणजे जबरदस्तीने ट्रान्स बनवणाऱ्यांसाठी कारावासाची शिक्षा आहे. एकतर ट्रान्स जबरदस्तीने बनवले जाऊ शकत नाहीत. पण या कलमाचा गैरवापर करून ट्रान्स व्यक्तींना साथ देणाऱ्या लोकांवर आणि संस्थांवर दबाव टाकला जाऊ शकतो.'२०१९ च्या कायद्यानुसार 'नॅशनल कौन्सिल फॉर ट्रान्सजेंडर पर्सन्स' () स्थापन करण्यात आली आहे. हा समिती केंद्र सरकारला ट्रान्सजेंडर व्यक्तींविषयी धोरणे, कार्यक्रम आणि कायदे तयार करण्याबाबत सल्ला दिला जातो. या परिषदेला सामाजिक न्याय मंत्री आणि राज्यमंत्री अध्यक्षस्थानी असतात. या समितीने या विधेयकाबाबत आम्हाला कोणतीही माहिती दिली नसल्याचं म्हटलं आहे. या समितीत काम करणाऱ्या सदस्यांनी ''आम्ही सरकारसोबत जवळपास रोज काम करत असतानाही हे बदल अचानक आणले गेले.'' त्यांनी असेही नमूद केले की, अलीकडेच दिल्ली सरकारने एक बैठक घेतली होती, ज्यामध्ये पारंपरिकरित्या भिक्षा मागण्याशी जोडल्या गेलेल्या ट्रान्सजेंडर व्यक्तींची ओळख पटवण्याबाबत चर्चा झाली. पण याबाबत कोणतीही चर्चा करण्यात आली नसल्याचे सांगितले.

# महाडमध्ये चवदार तळे सत्याग्रह दिन; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५५ कोटींच्या विकासकामांचा प्रारंभ

महाड (रायगड) -दलितोद्धार चळवळीतील ऐतिहासिक टप्पा ठरलेल्या महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाला आज ९९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर महाड येथे भव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चवदार तळे सुशोभीकरण आणि जलशुद्धीकरण प्रकल्पाचं भूमिपूजन करण्यात आलं. या कामासाठी राज्य शासनाकडून ५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चवदार तळे सत्याग्रह हा केवळ पाण्यासाठीचा लढा नसून समतेची क्रांती असल्याचं सांगितलं. समाजातील विषमता आणि जातिभेद दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी उभारलेली ही चळवळ ऐतिहासिक असल्याचं त्यांनी नमूद केले. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचं आवाहन करत महाडमध्ये शिवसृष्टी आणि भीमसृष्टी उभारण्याची मागणी केली.

मंत्री भरत गोगावले यांनी आपल्या भाषणात पुढील वर्षी चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी मोठ्या प्रमाणावर साजरी करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच महायुती सरकारच्या काळात शिवसृष्टी आणि भीमसृष्टी उभारण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली. ''आम्ही असे कार्यक्रम कधीच चुकवले नाहीत. त्यामुळे जनतेनं आम्हाला निवडून दिले'', असेही ते म्हणाले. पुढील वर्षी चवदार तळ्याचं पाणी सर्वांसाठी पिण्यायोग्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची तब्येत बिघडल्यामुळे ते येऊ शकले नसल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी मंत्री संजय शिरसाट यांनी दलित समाजाच्या शिक्षणासाठी १२०० कोटींचा निधी, समाजकल्याण विभागात ८८९ जणांना नोकऱ्या आणि भविष्यात वसतिगृह उभारण्याची घोषणा केली. एकूणच, चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त महाडमध्ये इतिहास, राजकारण आणि विकास यांचा संगम पाहायला मिळाला आहे. पुढील वर्षीच्या शताब्दी सोहळ्याची पायाभरणी याच कार्यक्रमातून झाल्याचे चित्र आहे.

चवदार तळ्याचं पाणी होणार शुद्ध- चवदार तळे सुशोभीकरणासाठी मिळालेल्या निधीवरून राजकीय श्रेयवादही रंगला आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी हे महायुती सरकारचे सामूहिक काम असल्याचे सांगितले. तसेच भरत गोगावले यांनी पाठपुरावा केल्याचं स्पष्ट केलं. चवदार तळ्याचं पाणी पिण्यायोग्य नसल्यामुळे व्यक्त होत असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसीमार्फत जलशुद्धीकरणाचे काम केलं जाणार असल्याची माहिती शिरसाट यांनी दिली.

कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मंत्री संजय शिरसाट, मंत्री उदय सामंत, मंत्री भरत गोगावले, मंत्री अदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे आदी उपस्थित होते. पोलीस दलामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नियोजित दौरा तब्येत बिघडल्यामुळे रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# अमेरिकन एफ-३५ लढाऊ विमान पाडले; इराणचा दावा

**तेहरान/ वृत्तसंस्था :** अमेरिकेचे अत्याधुनिक एफ-३५ लाटनिंग ।। लढाऊ विमान लक्ष्य करून इतिहास घडवल्याचा दावा इराणने केला आहे. जगातील सर्वात प्रगत पाचव्या पिढीतील या स्टेल्थ फायटरला प्रथमच लक्ष्य करण्यात आले आहे.



अमेरिकेची पुष्टी; पण नुकसान अस्पष्ट

अमेरिकन संरक्षण अधिकार्यांनी मान्य केले की, एका एफ-३५ विमानाला इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. विमान सुरक्षितपणे उतरले असून वैमानिक सुरक्षित आहे; मात्र विमानाच्या नुकसानाबाबत तपास सुरू आहे.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने सांगितले की, त्यांच्या आधुनिक हवाई संरक्षण प्रणालींनी पहाटे २.५० वाजता मध्य इराणच्या हवाई क्षेत्रात हे विमान लक्ष्य केले. त्यांच्या मते, या हल्ल्यानंतर विमान कोसळण्याची शक्यता जास्त असून त्याचा अंतिम परिणाम अजून स्पष्ट नाही.

आयआरजीसीने असेही सांगितले की, त्यांनी यापूर्वी १२५ हून अधिक अमेरिकन-इस्रायली ड्रोन पाडले आहेत. यामुळे इराणच्या हवाई संरक्षण व्यवस्थेत मोठी सुधारणा झाल्याचे संकेत मिळतात. घटनेनंतरही अमेरिकेने आपली भूमिका ठाम ठेवली आहे.

१० कोटी डॉलर्सचे विमान

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे प्रवक्ते कॅप्टन टिम हॉकिन्स यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित एफ -३५ विमानाने मध्यपूर्वेतील एका अमेरिकन तळावर सुरक्षित लँडिंग केले. 'वैमानिकाची प्रकृती स्थिर असून संपूर्ण घटनेचा तपास सुरू आहे,' असे त्यांनी सांगितले. सुमारे १०० दशलक्ष डॉलर किमतीचे हे अत्याधुनिक स्टेल्थ विमान इराणच्या हल्ल्यामुळे बाधित झाले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, याबाबत अमेरिकेने अधिकृत पुष्टी दिलेली नाही.

## कार्तिक आर्यनचा नागझिलामधील फर्स्ट लूक आला समोर

मुंबई – अभिनेता कार्तिक आर्यन सध्या नागझिला: नाग लोक का पहला कांड या चित्रपटामुळं खूप चर्चेत आहे. तो शेवटी तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी या चित्रपटात अनन्या पांडेबरोबर दिसला होता. त्याचा हा चित्रपट रुपेरी पडद्यावर काही विशेष कामगिरी करू शकला नाही. आता, कार्तिक लवकरच इच्छाधारी सापाच्या भूमिकेत मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. कार्तिकच्या आगामी नागझिला: नाग लोक का पहला कांड या चित्रपटाची पहिली झलकही प्रदर्शित झाली आहे. या चित्रपटात कार्तिक इच्छाधारी सापाची भूमिका पहिल्यांदा साकारताना दिसणार आहे. ॲमेझॉन प्राइम व्हिडिओनं १९ मार्च रोजी मुंबईत आयोजित इट स्टार्ट्स हिअर कार्यक्रमात, कार्तिक आर्यन-अभिनीत नागझिला: नाग लोक का पहला कांड हा चित्रपट त्यांच्या २०२६च्या कंटेंट स्लेटचा भाग म्हणून अधिकृतपणे लॉन्च केले. नागझिलामध्ये कार्तिक इच्छाधारी सापाची भूमिका साकारणार : या चित्रपटामध्ये खूप कॉमेडी पाहायला मिळणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमुळं आता अनेकजण हा चित्रपट पाहण्यासाठी खूप आतुर झाले आहेत. या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये वातावरणाची आणि भव्यतेची पहिली झलक देण्यात आली आहे. दरम्यान कार्तिक आर्यन एका महाकाय सपासमोर उभा असल्याचा पोस्टरमध्ये दिसत आहे. फुक्रे फ्रँचायझीसाठी ओळखले जाणारे मृगदीप सिंग लांबा यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट, कार्तिकनं साकारलेल्या इच्छाधारी सापावर आधारित असणार आहे.

# देशासह राज्यातील वनक्षेत्राताची घट अत्यंत चिंताजनक

जगातील वन क्षेत्र संरक्षित रहावे व जंगलातील संपूर्ण जीवजंतूंचे संरक्षण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभाने २०१२ ला २१ मार्च हा दिवस ''आंतरराष्ट्रीय वन दिवस'' साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात २१ मार्चला आंतरराष्ट्रीय वन दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून ठेपली आहे.कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे.आज निसर्गावर सर्वंच काही अवलंबून आहे.आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसर्गाची संपूर्ण जळमुळ वनक्षेत्रावर अवलंबून असते. वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष,परंतु आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतः च्या स्वार्थासाठी कुऱ्हाड चालवून घनाघाती प्रहार केला आहे.आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र आहे म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून ग्लेशियर वितळणे,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन, अती उष्णता, अती पाऊस, सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे. आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्के असने गरजेचे आहे.परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. म्हणजेच राज्यासह देशातील वनक्षेत्र भरपूर पिछाडीवर आहोत.महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र म्हणजे मोठी धोक्याची घंटा आहे.देहरादून येथील ''फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया'' या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला.हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो.वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पहाले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ,ओरिसा, तेलंगणा,या राज्यातील वनक्षेत्र गेल्या दोन वर्षांत वाढले आहेत.तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गणना होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे.इतर राज्याच्या तुलनेत जर महाराष्ट्राचा विचार केला वनक्षेत्राच्या बाबतीत अत्यंत निचकांक असुन गंभीर परिस्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबुन असते.त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षिर हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारा पाहिजे.आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी राज्य सरकारने स्विकारली पाहिजे. वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पडुन भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.आपण रोज मिडियाच्या माध्यमातून पहात असतो की,गावात, शहरात, कोणाच्या घरात,रोडवर हिंसक प्राणी(वाघ, बिबट्या,अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरतांना दिसतात.याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहेत.देशात हत्ती कर्नाटक व ओरिसा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्ती पैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येतांना दिसतात.यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ओडिशात गेल्या ११ वर्षांत ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार , विजेता झटका यामुळे त्यांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते. घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून देशातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने ''स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४ '' हा अहवाल सादर केला आहे. त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे.



वायुप्रदुषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातुन वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालय अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उत्पन्नाच्या तुलनेत ‘एसटी’ला दररोज २ कोटींचा तोटा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) सध्या दररोज १ ते २ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा असलेल्या एसटीला केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे आता शक्य नाही. या पार्श्वभूमीवर, महामंडळाने डिझेल खरेदीत पारदर्शकता आणून वार्षिक २४१ कोटींची बचत साधली असून, आता उत्पन्न वाढीसाठी व्यावसायिक इंधन विक्री आणि जाहिरात क्षेत्रात आक्रमक पाऊल टाकले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली.

फेब्रुवारी २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात एसटीला सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. हा तोटा भरून काढण्यासाठी महामंडळाने 'पर्यायी उत्पन्न स्रोत' निर्माण करण्याची विशेष योजना आखली आहे. डिझेल खरेदीच्या निविदा प्रक्रियेत कोणताही राजकीय हस्तक्षेप न होऊ दिल्याने महामंडळाला मोठा आर्थिक फायदा झाला आहे. यापूर्वी प्रति लिटर मिळणारी २.७० रुपयांची सवलत आता ५.१३ रुपयांपर्यंत वाढली आहे. एसटीला वर्षाकाठी ४० कोटी लिटर डिझेल लागते, ज्यावर सुमारे ३ हजार ४०० कोटी रुपये खर्च होतात. नव्या निविदा प्रक्रियेमुळे दरात प्रति लिटर २.१३ रुपयांची अतिरिक्त सवलत मिळाल्याने महामंडळाचे वर्षाला २४१ कोटी रुपये वाचणार आहेत. काही कंपन्यांनी या प्रक्रियेत खोडा घालण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने महामंडळाच्या पारदर्शक भूमिकेवर शिक्कामोर्तब झाले, असे सरनाईक यांनी नमूद केले.

**एसटी इंधन विक्री क्षेत्रात उतरणार**

- एसटी आता स्वत: व्यावसायिक इंधन विक्री क्षेत्रात उतरणार आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यातील १०० ते ११० ठिकाणी 'मल्टी-मोडल' इंधन पंप उभारले जातील. येथे डिझेल, पेट्रोलसह सीएनजी, एलएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा असेल. धुळे येथील प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाला असून, या उपक्रमातून वार्षिक १०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

- इंधन भरताना होणारी गळती आणि अनियमितता रोखण्यासाठी महामंडळ आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) आधार घेणार आहे. प्रत्येक एसटी बसच्या इंधन टाकीला आणि पंपाच्या नोझलला एआय आधारित सेन्सर बसवले जातील. सध्याच्या पारंपरिक पद्धतीत दर १०० लिटरमागे होणारी ४ ते ५ लिटरची घट या तंत्रज्ञानामुळे पूर्णपणे थांबवता येईल.



**जाहिरातींतून २५० कोटींचे लक्ष्य**

एसटीच्या ६०० बसस्थानकांवरून दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. या 'फूटफॉल'चा वापर जाहिरातींसाठी केला जाणार आहे. डिजिटल फलक आणि बसच्या अंतर्गत-बाह्य भागातील जाहिरातींमधून पुढील पाच वर्षात २५० कोटी रुपये मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सध्या हे उत्पन्न केवळ २० कोटींच्या घरात आहे.

**सौरऊर्जा प्रकल्प राबवणार**

त्याशिवाय बसस्थानकांच्या छतावर सौर प्रकल्प उभारून वीज विक्रीतून १५ कोटींची बचत केली जाणार आहे. चालक-वाहकांच्या ड्युटी नियोजनात एआयचा वापर करून ओव्हरटाइम खर्चात कपात केली जाईल, जुन्या बसच्या विल्हेवाटीतून अतिरिक्त महसूल मिळवण्याचे नियोजन आहे. एसटीमध्ये आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता आणणे हे आमचे प्राधान्य आहे. केवळ सरकारी मदतीवर अवलंबून न राहता, स्वावलंबी होऊन एसटीला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## आंबा बाग अवकाळी पावसाने उद्ध्वस्त; लाखोंचे नुकसान; तात्काळ मदतीची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील देवपिंपळगाव येथे काल सायंकाळच्या सुमारास झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. या गारपिटीचा सर्वाधिक फटका फळबागांना बसला असून, एका शेतकऱ्याच्या तब्बल तीन एकर केसर आंबा बागेचे मोठे नुकसान झाले आहे.गारांच्या तडाख्यामुळे झाडांवरील बहुतांश आंबे खाली पडले असून, उरलेल्या फळांनाही गंभीर जखमा झाल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण बाग होत्याची नव्हती झाल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळत आहे. फळ उत्पादक शेतकरी तुकाराम नन्नवरे यांनी सांगितले की, या बागेसाठी लाखो रुपयांचा खर्च झाला असून आता सर्वच नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ पंचनामा करून हेक्टरी तीन ते साडेतीन लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## पुण्यात हळदीच्या पाकिटांतून गांजाची तस्करी; पोलिसांकडून दोन भावांना बेड्या, १६ किलो साठा जप्त!

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील उच्चभ्रू बाणेर परिसरात हळदीच्या पाकिटांच्या आडून गांजाची विक्री करणाऱ्या रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात बाणेर पोलिसांनी अभिषेक भिका बोरसे आणि अक्षय भिका बोरसे या दोघांना अटक करत तब्बल १६ किलो गांजा जप्त केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेर परिसरात दोन तरुण दुचाकीवरून गांजा विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी महापालिकेच्या जलतरण तलावाजवळ सापळा रचला. संशयितांना अडवून चौकशी केली असता त्यांच्या ताब्यातील पिशवीत हळदीची पाकिटे आढळून आली. या पाकिटांची तपासणी केल्यानंतर पोलिसांनाही धक्का बसला. कारण हळदीच्या नावाखाली या पाकिटांमध्ये गांजा लपवून ठेवण्यात आला होता. सुरुवातीला पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ३ किलो गांजा जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपींनी पिंपरी-चिंचवड येथील त्यांच्या घरात आणखी अमली पदार्थ साठवून ठेवल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकत आणखी १३ किलो गांजा जप्त केला. अशा प्रकारे एकूण १६ किलो गांजा हस्तगत करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपी खासगी कंपनीत नोकरी करत असल्याची माहिती समोर आली असून ते हळदीच्या पाकिटांचा वापर करून गांजाची विक्री करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

# दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पकडली; इर्टिगा कारसह मुद्देमाल जप्त



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात पोलिसांनी मोठी कारवाई करत दरोड्याचा कट उधळून लावला आहे. चुंचाळे गावाजवळ संशयास्पद हालचाली करत असलेल्या पाच जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून सुमारे ११ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोपडा-लासूर रस्त्यावरील चुंचाळे गावाजवळ काही जण दरोडा आणि जबरी चोरीच्या उद्देशाने फिरत असल्याची माहिती चोपडा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ पथक तयार करून घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी संशयित इर्टिगा कारची तपासणी केली असता, त्यामध्ये पाच जण आढळून आले. चौकशीदरम्यान गाडीतून गावठी कट्टा, जिवंत काडतुसे, दोरी, मिरची पूड तसेच दरोडा टाकण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले.

अटक करण्यात आलेले सर्व आरोपी नगर जिल्ह्यातील असून, त्यांच्याविरुद्ध चोपडा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, मध्यप्रदेशातील उमरटी परिसरातून अवैध शस्त्रांची विक्री होत असल्याची माहिती समोर आली असून, चोपड्यात अलीकडेच झालेल्या घरफोड्यांमध्ये या आरोपींचा सहभाग आहे का, याबाबत पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे.

या कारवाईत वाहनासह एकूण ११ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी दिली.

## पाटस येथे कंटेनरची धडक; एसटी बस पलटी, तिघे किरकोळ जखमी



**पुणे/प्रतिनिधी :** पाटस येथील पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्ग वर बारामती फाट्यानजिक कंटेनरच्या धडकेनंतर एसटी बस पलटी झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २० मार्च) पहाटे सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात २ ते ३ प्रवासी किरकोळ जखमी झाले असून सर्व जखमींनी प्राथमिक उपचार घेऊन घरी परतल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-०६ बीडब्ल्यू-८४३८ क्रमांकाची एसटी बस सोलापूरहून पुण्याकडे येत होती. पाटस येथील बारामती फाट्यानजिक सुरू असलेल्या पुलाच्या कामाजवळ कंटेनरने धडक दिल्याने बस पलटी झाली. अपघातानंतर कंटेनर चालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. सदर ठिकाणी सुरू असलेल्या पुलाच्या कामामुळे वाहतूक अरुंद मार्गाने सुरू असून वाहनांना धोकादायक परिस्थितीतून मार्ग काढावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वेग नियंत्रणात नसल्याने अपघातांची शक्यता वाढत आहे. त्यामुळे पाटसबारामती फाटा परिसर ‘मृत्यूचा सापळा’ ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. या मार्गावर यापूर्वीही अनेक अपघात झाले असून काहींना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे महामार्ग प्रशासनाने तातडीने सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. दरम्यान, या प्रकरणी एसटी बस चालक दीपकसिंग हजारे यांच्या फिर्यादीवरून यवत पोलीस स्टेशन येथे अज्ञात कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.


## शब्दकोडे क्र. 86

आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला ५. असामान्य ८. पान (सं.) ९. दृष्ट १०. 'पुरी'चे दैवत १२. मोठा नगारा १३. नवरदेव १४. व्याख्यान १५. रेशमचा किडा १६. अंदाज, तर्क १८. राबता, जाणे-येणे २०. प्रमाणपत्र २२. मच्छर २४. स्वाभिमानी स्त्री २५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका २७. धमकी, श्वास ३०. व्यवस्थित ३२. अखबार ३३. कासंडी, दुधाची घागर ३४. हाताचा एक अवयव ३६. व्यवस्था ३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम ४०. जहाजांचा मुक्काम ४१. फळातील द्रव ४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड ४३. पंगत ४५. दरोडा ४७. अपशकुन ५०. नकला करणारा ५२. हिशोबाची एक बाजू ५४. यात्रेत नियमित जाणारा ५६. दुधाच्या वड्या ५८. शेजारी शेजारी ६०. झकास ६१. एक मंगलवाद्य ६३. निवासस्थान ६४. समोरसमोरची चकमक ६५. पूर्णपणे ६७. एक सुगंधी वनस्पती ६८. समुद्र ७०. रमणीय ७१. असुर, दानव, देवांचा शत्रू ७२. गाजावाजा ७३. किंमत, पैसा ७४. विशेष ७५. चंद्र ७६. निकट, जवळ ७८. भूकंप ८०. मलई ८१. फरक ८२. घराणे ८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण २. पहारेकरी ३. कलंक ४. सुकुमार ५. न थांबता ६. धैर्य ७. दारूचा एक प्रकार ८. उद्याच्या नंतरचा दिवस ११. गर्दीचा विळखा १३. भावाची पत्नी १५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते! १७. धार्मिक पर्यटन १८. महिला, बाई १९. प्रफुल्लित २१. पटपट, वेळ न दवडता २३. मानसिक धक्का (हिंदी) २६. वस्तूचा छोटा तुकडा २८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा २९. वार्ताहर ३०. पाणी ३१. आई-वडील ३३. सूत काढण्याचे एक साधन ३५. आरोळी, ललकारी ३७. जिव्हा ३९. मळलेले ४०. आपला नसलेला ४४. अरण्य ४६. अंजन ४८. चेष्टेखोर ४९. न वापरलेली, नवी ५१. दुलई ५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली ५५. लेखणी ५६. भिऊन पळ काढणारा ५७. भटकणारा ५९. आशीर्वाद ६१. माळ, हार ६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा ६४. तुलनेतील सारखेपणा ६५. अनुत्तीर्ण ६७. चर्चा ६८. लाकडाची उत्कृष्ट जात ६९. रानरेडा ७०. सुंदर तरुणी ७३. दरवाजा ७४. मृत्तिकापात्र ७५. सुविधा ७७. मगज ७८. द्रव्य ७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा



### शब्दकोडे क्र. 85 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०.धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

उभे उत्तर

२.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी

# गॅस तुटवड्याने नागरिक हैराण; महिला आघाडीचा सरकारला इशारा

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन; काळाबाजार रोखण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील घरगुती व व्यावसायिक गॅसचा वाढता तुटवडा आणि दरवाढ यामुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाले असून, याविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडी आक्रमक झाली आहे. तालुकाप्रमुखांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले असून ते जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गुढीपाडवा व रमजानसारख्या सणासुदीच्या काळातही गॅसचा गंभीर तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस सिलेंडर बुकिंगनंतर वेळेवर मिळत नसल्याने तसेच बुकिंग प्रक्रिया सुरळीत नसल्याने नागरिकांना





तासन्तास रांगेत उभे राहूनही सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

तसेच, अधिकृत प्रक्रियेत गॅस उपलब्ध नसताना अतिरिक्त दोन ते अडीच हजार रुपये दिल्यास सहज सिलेंडर मिळत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू असल्याचा आरोप महिला आघाडीने केला असून, सामान्य नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचेही नमूद केले आहे. दरम्यान, घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात झालेली ६० रुपयांची वाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

व्यावसायिक गॅसचा पुरवठा ठप्प झाल्याने हॉटेल, खानावळ व लघुउद्योजकांवर गंभीर परिणाम झाला असून, अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात आला आहे. महिला आघाडीने सरकारकडे गॅस पुरवठा सुरळीत करणे, बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाई करणे, व्यावसायिक गॅसचा पुरवठा तात्काळ पूर्ववत करणे तसेच बाधित व्यावसायिक व विद्यार्थ्यांना आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी अनितातार्इ जाधव, भावनाताई पाटील, स्मिताताई वराडे, अर्चनाताई शेळके, सुनंदाताई खरात, रत्नाताई शेळके, पुजाताई शिंगणे, रोशनीताई गरड, अश्विनीताई फदाट, आम्रपाली कंकाळ यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## वृत्तविशेष...

### वृद्ध व्यवसायिकाचे अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन; आरोपी अटकेत



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहरातून एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका ७० वर्षीय वृद्ध व्यवसायिकाने अल्पवयीन मुलीच्या विनयभंग केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.याप्रकरणी वृद्धाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक देखील करण्यात आली आहे.शंकर मंगतानी (वय ७०) असे आरोपीचे नाव असून आहे.तो बुलढाण्यातील एक व्यापारी असून तो पीडित मुलीच्या व त्याच्या घरच्यांच्या परिचयाचा आहे.आरोपी आणि पीडित कुटुंबामध्ये पूर्वीपासून येणे जाणे होते..मात्र, विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने मुलगी एकटी असताना तिच्याशी अश्लील वर्तन करत विनयभंग केल्याचा आरोप आहे. त्यानंतर पीडित मुलीनेही हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला आणि कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली आहे.

### भोंदू बाबांवर संजय गायकवाड यांचा हल्लाबोल; ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी बाब



**बुलढाणा/प्रतिनिधी :**भोंदू बाबांच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले असून आमदार संजय गायकवाड यांनी या प्रकारावर जोरदार टीका केली आहे. भोंदू बाबांचे पाय धुऊन त्यांचे पाणी पिणे ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी बाब असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. गायकवाड यांनी यावेळी काही राजकीय नेत्यांवरही अप्रत्यक्ष निशाणा साधत, नोकरी करत असताना अचानक बाबा बनून लोकांची फसवणूक करणाऱ्यांवर सवाल उपस्थित केला. अशा भोंदू बाबांचे समर्थन करणे किंवा त्यांचे लांगूलचालन करणे समाजासाठी चुकीचा संदेश देणारे आहे, असेही त्यांनी नमूद केले. रूपाली चाकणकर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा टोला लगावल्याचे बोलले जात असून, त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चांना उधाण आले आहे.

### गारपिटीने शेतकरी संकटात; आमदार डॉ. संजय रायमुलकर यांची तात्काळ पाहणी





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :**मेहकर तालुक्यातील पिंपळगाव काळे, पेनटाकळी, शिवाजीनगर, पोखरी व लव्हाळा परिसरात झालेल्या अचानक गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आपत्तीमुळे मका, गहू, कांदा आणि चिया या पिकांचे मोठे नुकसान होऊन शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी पिंपळगाव काळे येथे भेट देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांना धीर दिला. दरम्यान, आमदार रायमुलकर यांनी महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर शासकीय मदत मिळावी, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या वेळी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### अशोक खरात प्रकरण तापलं; रूपाली चाकणकरांवर आरोप, राजीनाम्याची मागणी तीव्र

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक येथे अशोक खरात यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचे पडसाद राज्यभर उमटत असून, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, अशोक खरात यांच्यासोबत रूपाली चाकणकर यांचे फोटो व्हायरल झाल्याने त्यांच्या सहभागाबाबत संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) पदाधिकाऱ्यांनी गंभीर आरोप करत, चाकणकर यांनी पदावर राहिल्यास प्रकरणात हस्तक्षेप होऊ शकतो, अशी भूमिका मांडली आहे. या मागणीसाठी जळगाव येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना (ठाकरे गट) तर्फे तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनात महिला आघाडी प्रमुख मनीषा पाटील, उपजिल्हाप्रमुख भाऊसाहेब सोनवणे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी मनीषा पाटील आणि भाऊसाहेब सोनवणे यांनी प्रतिक्रिया देत, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि रूपाली चाकणकर यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी केली. दरम्यान, या प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात नवे वादंग निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सांगलीत मंत्री चंद्रकांत पाटील यांचा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल



**सांगली/प्रतिनिधी :** एका लुगड्याने बाई म्हातारी होत नाही, अजून लई बाकी आहे, अशा शब्दांत राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर जोरदार टीका केली. सांगली जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर ते बोलत होते. विरोधकांनी एकत्र येत भाजपाला लक्ष्य केल्याचा आरोप करत पाटील यांनी जयंत पाटील विश्वजित कदम आणि विशाल पाटील यांच्यावर थेट निशाणा साधला. सांगली जिल्हा परिषद निवडणुकीसाठी एवढा अट्टाहास कशासाठी, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हा काही डोनाल्ड ट्रम्प यांचा पराभव आहे का? असा टोला लगावत, भाजपाचा पराभव करण्यासाठी विरोधकांना तीन पिढ्यांचे वैर विसरून एकत्र यावे लागले, अशी टीकाही त्यांनी केली. यावेळी पाटील यांनी आत्मपरीक्षण करत मागील निवडणुकीत भाजपाकडून काही चुका आणि अरेरावीची भाषा झाली होती, त्यामुळे पराभव झाला, अशी कबुली दिली. मात्र, यापुढे विरोधकांनी आपल्या खासदारपद आणि आमदारपदाची चिंता करावी, असा इशाराही त्यांनी दिला. मंत्री चंद्रकांत पाटील सांगली दौऱ्यावर असताना त्यांनी ही भूमिका मांडली.

### एसटी सेवानिवृत्तांसाठी १२ महिन्यांच्या पासची मागणी; आमदार संजय रायमूलकर यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** एसटी महामंडळातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सध्या मिळणारा ९ महिन्यांचा प्रवास पास वाढवून १२ महिन्यांचा करण्यात यावा, तसेच सर्व प्रकारच्या एसटी बसमध्ये कोणतीही अट न ठेवता प्रवासाची मुभा द्यावी, या मागणीसाठी ई.पी.एस. संघटनेतर्फे संजय रायमूलकर यांना निवेदन देण्यात आले.

सध्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणारा पास केवळ साध्या (लाल) बसपुरताच मर्यादित असून इतर बसमधून प्रवास करताना भाड्यातील फरक भरावा लागतो. याशिवाय या पासची मुदतही ३१ मार्च रोजी संपणार आहे. त्यामुळे हा पास १२ महिन्यांसाठी लागू करावा आणि पूर्ववत सुविधा कायम ठेवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, ३ जून २०२५ रोजी झालेल्या कामगार संघटनांच्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी १२ महिन्यांच्या पासची घोषणा केली होती. त्यानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख किसनराव बळी यांच्या नेतृत्वाखाली आमदार रायमूलकर यांच्या निवासस्थानी हे निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार रायमूलकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी डी. एच. मोरे, आसाराम फंगाळ, डी. एल. टेकाळे, समाधान जुमडे, एस. के. नवले, बी. यू. सराटे, एस. यू. सौभागे यांच्यासह मोठ्या संख्येने सेवानिवृत्त कामगार उपस्थित होते.

### बारामती पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार देणार

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होईल, असा कयास बांधला जात असताना, काँग्रेसने या निवडणुकीत उमेदवार देण्याची भूमिका घेतली आहे. शरद पवार गट ही निवडणूक लढवणार नसेल, तर त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, आमच्याकडे पर्याय तयार आहे, असे विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.महाड येथील चवदार तळे सत्याग्रह दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने रायगडमध्ये माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. सपकाळ म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत बारामतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने लढवली होती. त्यामुळे पोटनिवडणूक लढवण्याबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. ते जर लढत नसतील, तर आमच्याकडे अनेक पर्याय आहेत. अंतिम निर्णय हा महाविकास आघाडी घेईल, असेही त्यांनी सांगितले.

# वडाळी युवकांचा खरा पक्षप्रवेश कोणता?

## मेहकरात श्रेयवादाची राजकीय लढाई चिघळली

### दोन्ही गटांचे परस्परविरोधी दावे; फोटो काढून प्रवेश दाखवल्याचा युवकांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर मतदारसंघात वडाळी येथील युवकांच्या कथित पक्षप्रवेशावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला असून, दोन्ही गटांकडून परस्परविरोधी दावे केल्यामुळे खरा पक्षप्रवेश नेमका कोणत्या गटात झाला याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

दिनांक १५ मार्च २०२६ रोजी वडाळी येथील काही युवकांनी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केल्याचा दावा तालुका संघटक श्याम पाटील निकम यांनी पत्रकार परिषदेत केला. उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे





व सर्कल प्रमुख पंडित बापू देशमुख यांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाल्याचे त्यांनी सांगितले. माजी आमदार डॉ. रायमूलकर यांनी हा प्रवेश बळजबरीने घडवून आणल्याचा आरोप केला होता, तो फोल असल्याचेही निकम यांनी स्पष्ट केले.

यावेळी निकम यांनी माजी आमदारांवर टीका करताना आमदार सिद्धार्थ खरात यांच्याबाबत एकेरी भाषेचा वापर टाळावा, अन्यथा ''शिवसेना स्टाईल'' उत्तर दिले जाईल, असा इशाराही दिला. तसेच मागील कार्यकाळात विकासकामे न केल्याचा आरोप करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांच्या कामांवरूनही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दरम्यान, या प्रकरणाला वेगळे वळण देत वडाळीतील संबंधित युवकांनी माजी आमदार संजय रायमुलकर यांची भेट घेत आपण शिवसेना (शिंदे गट) चेच कार्यकर्ते असल्याचा खुलासा केला. आमदार खरात यांच्या कार्यालयात रामनवमी उत्सवासाठी वर्गणी मागण्यासाठी गेलो असता गळ्यात पक्षाचे रुमाल घालून फोटो काढण्यात आले आणि पक्षप्रवेशाच्या बातम्या व्हायरल करण्यात आल्याचा आरोप युवकांनी केला.

यावेळी संजय रायमुलकर यांनीही उबाठा गटावर टीका करत खोटी माहिती पसरवून जनतेची दिशाभूल करू नये, असे सांगितले. तसेच त्यांच्या कार्यकाळात विविध विकासकामे व महापुरुषांच्या पुतळ्यांसाठी दिलेल्या योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला.

या परस्परविरोधी दाव्यांमुळे वडाळीतील युवकांचा खरा पक्षप्रवेश कोणत्या गटात झाला, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित असून मेहकर मतदारसंघात राजकीय वातावरण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत.